THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 23RD JULY 1896.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

खालीं दिलेला मसुदा आणि त्यासोबतचें हेतु व कारणें यांचें निरूपण हीं, आलीजाह् मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदेकानू करणाऱ्या मंडळीच्या सभांचें काम चालविण्याबाबदच्या कानूंपैकीं कानू १५ बरहुकूम प्रसिद्ध केलीं आहेत:—

### सन १८९६ चा मसुदा नंबर २.

#### सन १८८६ चा मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट सुधारण्याबाबत मसुदा.

ज्यापेक्षां सन १८८६ चा मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट यांत पुढें दिसण्याच्या रीतीनें सुधारणें योग्य आहे, त्यापेक्षां खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. सन १८८६ चा मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट याच्या ३ ऱ्या कलमाची रकम (१०) हींत "सरकार" या शब्दानंतर खालील शब्द दाखल केले पाहिजेत. ते येणेंप्रमाणें:—

"किंवा "स्थानिक सरकार"."

#### हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८८६ चा मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट यामध्यें आणि मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं केलेले सर्व कायदे व आक्ट यांमध्यें "सरकार" या शब्दाचा उपयोग जेथें जेथें केला असेल तेथें तेथें त्याचा अर्थ, विषयास किंवा संदर्भास कांहीं बाध येत नसल्यास, मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल असा होतो, अशी त्या शब्दाची व्याख्या सदरहू आक्टाच्या ३ऱ्या कलमाची रकम (१०) हींत केली आहे. तथापि, "स्थानिक सरकार" ही संज्ञा विशेष योग्य होईल असा विचार झाला आहे. सबब, सन १८८६चा मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट, याच्या ३ऱ्या कलमाची रकम(१०) ही सुधारून, सदरहू गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं केलेल्या कायद्यांमध्यें व आक्टांमध्यें "स्थानिक सरकार" या संज्ञेचा उपयोग जेथें जेथें केला असेल तेथें तेथें तिला, सदरहू रकमेंत "सरकार" या शब्दाचा जो अर्थ केला आहे तोच अर्थ लागू करण्याचें या मसुद्यावरून योजिलें आहे.

मुक्काम पुणें, तारीख १ माहे जुलै सन १८९६. (सही) एच्. बर्डवुड,

आलीजाह् नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादूर यांच्या हुकुमावरून,

मुक्काम पुणें, तारीख १९ माहे जुलै सन १८९६. एम्. एच्. डब्ल्यू. हेवर्ड,

सेक्रेटरी निसबत मुंबईचे गव्हर्नर यांची कायदेकानू करणारी मंडळी.

(True translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.